अर्थ, महत्त्व, भांडवलाची आवश्यकता
(1) स्थिर / खेळते भांडवल

## 1. संस्थात्मक वित्त व्यवस्थापनाचे स्वरूप

~~वित्त~~ प्र- पैसे व पैशाचे व्यवस्थापन निगडित आहे. व्यावसायिक संस्थेचे यश हे निधी उभारण्याची क्षमता व कार्यक्षमता यांवर अवलंबून असते.

पैसा हा एक हात आहे पाय आहे वापर करा किंवा गमवा – हेन्री फोर्ड.

अर्थ – संस्थात्मक वित्तव्यवस्था ही संस्थेसाठी निधी उपलब्धता व त्याचा विनियोग यांच्याशी संबंधित आहे. संस्थेच्या कार्यांना वित्त पुरवठा करणे, भांडवल संरचना, गुंतवणूक निर्णय यांच्याशी संबंधित असते.

हेन्री हॅगलँड मतानुसार, " संस्थात्मक वित्तव्यवस्था, व्यावसायिक संस्थेने केलेले भांडवल संपादन व त्याचा विनियोग या गोष्टींची हाताळणी करणे.

* (1) वित्तीय निश्चितीचा निर्णय– व्यावसायिक संस्थेला वित्तीय गरज भागविण्यासाठी ~~ए~~ बाजारात प्रवेश करण्याचा पर्याय उपलब्ध असतो. या ठिकाणी वित्त उभारणीचा पहिला पर्याय पतसंस्था, व

* (2) वित्त गुंतवणुकीचा निर्णय– हे निर्णय म्हणजे निधीचा योग्य रीतीने उपयोग करून भागधारकांना कमाल लाभांश मिळवून देणे. एकदा भांडवलाचे मूल्य कळले की, मग भांडवलावरील परतावा हा भांडवली मूल्यापेक्षा जास्त असेल अशा पद्धतीने निधीचे ~~वि~~ नियोजन संस्था करू शकते.

* संस्थात्मक वित्त व्यवस्थेचे महत्त्व–
व्यावसायिक संस्थेच्या कार्यात्मक व्यवस्थापनेत उत्पादन वित्त, विपणन तसेच कर्मचाऱ्यांच्या कृती या सर्वांना खूप महत्त्व आहे

Page:
Date: / /

(4) व्यवसाय सुरळीत चालण्यास मदत करते-
निधीचा ओघ सुरळीत असेल तरच कर्मचाऱ्यांचे पगार वेळेत देता येतात. कर्जाचे रक्कमेचे परतफेड वेळेत करता येते. कच्च्या मालाची जेव्हा गरज असते तेव्हा विकत घेता येते.

(5) विविध व्यावसायिक

(6) विस्तार व विविधी करणाला प्रोत्साहन देते-
विस्तारीकरण व विविधी करणासाठी प्रोत्साहन देते

* स्थिर भांडवल- दीर्घकालावधीसाठी वापरली जाणारी तसेच विक्रीच्या उद्देशाने न मालमत्ता खरेदी करण्यासाठी जे भांडवल लागते त्याला स्थिर भांडवल

* खेळते भांडवल- दैनंदिन व्यावसायिक कार्य पार पाडण्यासाठी आवश्यक असणाऱ्या भांडवलास खेळते भांडवल असे म्हणतात. स्थिर भांडवलाची आवश्यकता लक्षात घेतल्यानंतर प्रवर्तकांना व्यवसायाचे कार्य सुरळीत पार पाडण्यासाठी निधीचा अंदाज घ्यावा लागतो.

प्र ५ वी. ... सविस्तर, स्पष्टीकरणात्मक उत्तरे लिहा.

(१) व्यवस्थापनाची तत्त्वे म्हणजे काय ते सांगून व्यवस्थापनाच्या तत्त्वांचे स्वरूप स्पष्ट करा. (प्रत्येकी १० गुण)

**उत्तर : प्रस्तावना :** व्यवस्थापन तत्त्वांचा वापर आणि प्रयोग अनेक वर्षे सर्व जगात होत आहे. व्यवस्थापनाची तत्त्वे ...क प्रकारच्या व्यवसाय संघटनेस, सर्व परिस्थितीत लागू होतात. व्यवस्थापकाला निर्णय घेताना व्यवस्थापनाची तत्त्वे ...र्गदर्शक म्हणून उपयोगी ठरतात. व्यवस्थापन तत्त्वांमध्ये (अ) वर्णनात्मक (ब) मार्गदर्शक अशा दोन्ही प्रकारच्या तत्त्वांचा ...मावेश होतो.

**व्यवस्थापनाची तत्त्वे : व्याख्या -** ''व्यवस्थापनाची मूलभूत सत्य सांगणारी विधाने म्हणजे व्यवस्थापनाची तत्त्वे ...य.''

व्यवस्थापनाची तत्त्वे ही व्यवस्थापकांना एखाद्या दीपस्तंभासारखी असतात. तसेच ती पायाभूत स्वरूपाची असतात.

**व्यवस्थापन तत्त्वांचे स्वरूप :**

(i) **व्यवस्थापनाची तत्त्वे सार्वत्रिक आहेत :** व्यवस्थापन तत्त्वांचे स्वरूप सार्वत्रिक असते. व्यवस्थापनाची तत्त्वे सर्व ...कारच्या संस्थांना लागू होतात. संस्थेचे आकारमान आणि स्वरूप यानुसार व्यवस्थापनाची तत्त्वे लागू पडतात. सर्व स्थरांवर, सर्व ...रिस्थितीत, सर्व ठिकाणी लागू पडतात.

(ii) **व्यवस्थापनाची तत्त्वे लवचीक आहेत :** व्यवस्थापनाची तत्त्वे जरी पायाभूत स्वरूपाची तत्त्वे असली तरी त्यामध्ये ...रिस्थितीनुसार बदल करून घेता आला पाहिजे. म्हणजेच लवचीक असावीत. व्यवसायातील बदलत्या, गतिमान परिस्थितीनुसार, ...संगानुसार व्यवस्थापनाची तत्त्वे वापरता येतात.

जसे, लहान स्वरूपाच्या संघटनांमध्ये अधिकारांचे केंद्रीकरण, मोठ्या स्वरूपाच्या संघटनांमध्ये अधिकारांचे विकेंद्रीकरण ...श्रेयस्कर असते.

(iii) **कार्यकारण संबंध :** कार्यकारण संबंध म्हणजे कारण आणि परिणाम यातील परस्परसंबंध होय. व्यवस्थापन ...तत्त्वांमुळे कारण आणि परिणामातील परस्परसंबंध निश्चित होतात. व्यवस्थापन तत्त्वांच्या योग्य वापरामुळे अनेक प्रश्नांची ...समाधानकारकपणे सोडवणूक करता येते. ही तत्त्वे दोन घटकांतील कार्यकारण संबंध निश्चित करतात त्यामुळे व्यवस्थापक ...एखाद्या गोष्टीमागचे कारण जाणून घेतो.

उदा. (अ) कर्मचाऱ्यांना कामाचा अधिक मोबदला दिल्यास उत्पादनात ... होते. (ब) जाहिरात परिणामकारक

page no 2

ुसार विशेषीकरण होते. त्यामुळे खर्च, नासधूस कमी होऊन उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होते. साधनसंपत्तीचा जास्तीत ास्त वापर करून वेळ, शक्ती आणि श्रम वाचवितात. त्यामुळे कमी खर्चात जास्त उत्पादन मिळते.

(iii) **वस्तुनिष्ठ भूमिका घेण्यास मदत :** व्यवस्थापनात व्यवस्थापकाला भेडसावणारे प्रश्न, समस्या यांचे योग्यप्रकारे कलन होऊन वस्तुनिष्ठ उपाय शोधण्यास व्यवस्थापन तत्त्वांमुळे मदत होते. तसेच वस्तुनिष्ठ भूमिका घेण्यास, विचार ण्यास व्यवस्थापनाची तत्त्वे मदत करतात. यामुळे साहजिकच व्यवस्थापकाचा आत्मविश्वास वाढतो आणि तो अधिकाधिक गल्या प्रकारे व्यवस्थापन करतो.


(iv) **समन्वय आणि नियंत्रणास मदत :** व्यवसाय संस्थेच्या वेगवेगळ्या विभागांची उद्दिष्टे व एकंदर व्यवसायाची द्दिष्टे यामध्ये एकवाक्यता असली पाहिजे. सर्व विभागांच्या कार्यांचे अंतिम उद्दिष्ट व्यवसाय संस्थेचे उद्दिष्ट साध्य करणे असले पाहिजे. व्यवस्थापनाची तत्त्वे समन्वय आणि नियंत्रण करण्यास मार्गदर्शक ठरतात. व्यवस्थापन तत्त्वांमुळे सर्व ार्यांचे सुसूत्रीकरण करून व्यवस्थापक चांगल्या प्रकारे नियंत्रण ठेवू शकतो.

(v) **सामाजिक जबाबदारी समजण्यास मदत :** कोणताही व्यवसाय हा समाजाचाच एक घटक असतो. या माजाकडून व्यवसायाला उत्पादन साधने मिळतात. त्यामुळे समाजाचे आपण काही देणे लागतो या सामाजिक जबाबदारीची णीव व्यावसायिकाला असली पाहिजे. म्हणूनच आजच्या आधुनिक युगात सामाजिक जबाबदारीस अधिक महत्त्व दिले जाते. वसाय संघटनांनी केवळ नफ्यावर लक्ष केंद्रीत न करता सामाजिक जबादारीचे भान ठेवावे. व्यवस्थापन तत्त्वे सामाजिक बाबदारी पूर्ण करण्याचे अनेक मार्ग दाखवितात जसे – वेतनाचे तत्त्व, समानतेचे तत्त्व इ.

(vi) **संशोधन आणि विकासाला मदत :** व्यवस्थापनाची तत्त्वे ही काळानुसार बदलणारी असतात. त्यात अनेक बदल ले आहेत. तसेच या तत्त्वांच्या वापरामुळे अनेक बदल घडून आले आहेत. ही तत्त्वे विविध संशोधने हाती घेण्यास ार्गदर्शक ठरतात. इतकेच नव्हे तर बदलत्या काळाप्रमाणे व मागणीप्रमाणे त्यामध्ये योग्य ते बदल घडवून आणण्यासाठी


स्मरण तक्ता

(अ) **व्यवस्थापन तत्त्वांचे स्वरूप :**




page no 1

(आ) **व्यवस्थापन तत्त्वांचे महत्त्व :**



केल्यास वस्तूची विक्री वाढते. इ.

(iv) **मानवी वर्तणुकीत बदल घडवणे :** व्यवस्थापन हे एकसंघटित कार्य आहे. संघटनेची विशिष्ट उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सामूहिक प्रयत्न कारणीभूत ठरतात. विशिष्ट उद्दिष्ट साध्य करण्यासाठी एकसंघ अशी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता असते, अशा ठिकाणी व्यवस्थापन तत्त्वे उपयुक्त ठरतात. त्यांचा वापर केल्याने प्रयत्नांना निश्चित दिशा मिळते आणि कार्यक्षमता वाढते. म्हणून व्यवस्थापनाची तत्त्वे मानवी वर्तनावर परिणाम करतात.

(v) **सर्व तत्वांचे महत्त्व सारखेच :** संघटनेमध्ये वापरण्यात येणाऱ्या व्यवस्थापनाच्या सर्वच तत्वांना सारखेच महत्व असते. कोणतेही एकच तत्त्व इतर व्यवस्थापन तत्वांपेक्षा कमी अथवा जास्त महत्वाचे नसते. संघटनेत चांगल्या परिणामासाठी सर्वच तत्त्वे महत्त्वाची असतात. एका तत्त्वाचे जर नीट पालन झाले नाही तर त्यांचा परिणाम सर्व संघटनेवर होतो.

(vi) **व्यवस्थापन तत्त्वे सापेक्ष असतात :** व्यवस्थापन तत्वांचे स्वरूप शास्त्रीय तत्त्वांप्रमाणे साचेबंद नसते. व्यवस्थापन तत्त्वे सर्व प्रमाणात सापेक्ष असतात. सर्व प्रसंगात ती जशीच्या तशी लागू होतील असे नाही. वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळ्या स्वरूपात लागू होतात. आकार, स्वरूप, गरज लक्षात घेऊन बदल करावे लागतात.

अशाप्रकारे व्यवस्थापन तत्वांचे स्वरूप स्पष्ट होते.